REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# मराठी रंगभूमीवरील स्त्री नाटककारांचे योगदान

**श्री. नवनाथ विश्वनाथ पाटोळे**




मराठी रंगभूमीच्या पहिल्या शतकात स्त्रीयांनी फारसे नाट्यलेखन केलेले दिसून येत नाही. त्यानंतरच्या काळात अपवादात्मकपणे नावांची संख्या अधिक झाली. परंतु पुरुष नाट्य लेखकाच्या तुलनेत ही संख्या खूपच कमी आहे. कथा, कादंबरी, कविता, चरित्र, आत्मचरित्र, ललित लेखन या साहित्य प्रकारात स्त्रीयांनी विपुल प्रमाणात लेखन केले. त्या मानाने स्त्रीयांच्या लेखनीतून नाटक हा वाङ्‌मय प्रकार उपेक्षित राहिला. गुणवत्तेच्या प्रमाणात स्त्रीयांचे लेखन श्रेष्ठ ही झाले, परंतु नाट्यलेखन क्षेत्रातही अशी कामगिरी व्हायला हवी होती तशी ती झाली नाही ही मराठी नाटकाची शोकांतिका आहे. नव्या जाणिवांतून, भानातून, कार्यक्षेत्रातून काही नवीन समस्या निर्माण झाल्या. स्त्रीयांना आलेले अनुभव, त्यांनी भोगलेली दुःखे यांना स्त्रीयांनी नाट्यरुप कथा, कादंबरी, कविताच्या तुलनेने कमी प्रमाणात दिले. याविषयी दत्ता भगत म्हणतात, "प्रिया तेंडूलकर, गौरी देशपांडे, रजनी परुळेकर, पद्मजा फाटक, मल्लिका अमर शेख अशा काही लेखिकांच्या कथा आणि काव्य लेखनात स्त्रीवादी विद्रोही सूर स्पष्टपणे उमटलेले दिसतात. पण नाटक या प्रकाराकडे आपण वळलो तर फक्त बोटावर मोजण्या एवढा लेखनकृतींचेच उदाहरण आढळून येते" (१) स्त्रीयांनी केलेल्या नाट्यलेखनाचा पुढीलप्रमाणे परामर्श घेता येईल. 'कक्षा' (तारा वनारसे), 'बाधा', 'खून पहावा करुन', 'एक प्रेम झेलू बाई', (सरिता पदकी), 'हिरा जो भंगला नाही' (मालतीबाई बेडेकर), 'आराधना' (ज्योत्स्ना भोळे), 'लाल बंगली' (कुसुम अभ्यंकर), 'नेपोलियन' (कविता नरवणे), 'मुलगी झाली हो' (ज्योती म्हापसेकर) इ. नाटकांची संख्या होती. यात 'मुलगी झाली हो' या नाटकाशिवाय इतर नाटकांतही अपेक्षित अशी गुणवत्ता नव्हती. या नाट्य लेखिकांनी याच पध्दतीने माध्यमाचे भान राखून आपली दुःखे नाटकात लिहिणे आवश्क होते. परंतु तसे घडले नाही म्हणून नाट्यलेखिकांपासून मराठी रंगभूमी उपेक्षित राहिली. सरिता पदकींनी 'खून पहावा करुन' ही रुपांतरित नाट्यकृती मराठी रंगभूमीला दिली. परंतु यांनीही त्या लेखनात सातत्य राखले नाही.

'संगीत धुळीचे कण', 'वळणाचे पाणी वळणावर', 'सह्याद्रीची एक' ही नाटके सुमतीबाई धनवटे यांनी लिहिली. परंतु यांचे नाट्यलेखनही प्रवाहात टिकले नाही. जोत्स्ना देवधर यांनीही तीन नाटके लिहिली. 'कल्याणी', 'दीपदान', 'निर्णय', या नाटकांतील त्यांच्या 'कल्याणी' या नाटकाचा प्रयोग दीर्घस्मरणी ठरला. या नाटकात त्यांनी राजस्थानातील परंपरांचे चित्रण केले आहे. त्या परंपरेतून स्त्री, मनाची व स्त्री जीवनाची होणारी होलपट मांडली आहे. त्यांच्या या यशानंतर पुन्हा तेवढ्या ताकदीचे नाटक त्यांच्या लेखणीतून मराठी रंगभूमीवर अवतरले नाही. हे नाटक व्यावसायिक रंगभूमीवर ही यशस्वी झाले होते. या विषयी वि.भा.देशपांडे म्हणतात, "कल्याणी या नाट्यकृतीचे स्वागतही बऱ्यापैकी झाले. पण त्यांनीही तितक्या ताकदीचे नाटक-लेखन नंतरच्या काळात केले नाही. ते पाहून जोत्स्ना देवधर अधिक सधन आशयाचे व्यावसायिक नाटक लिहितील अशी अपेक्षा होती." (२) परंतु या नंतरची त्यांची सर्व नाटके हौशी स्तरावर लिहिली गेली. यानंतर शिरीष पै यांनी चार नाटके मराठी रंगभूमीला दिली. 'सोन्याची खाण', 'हा खेळ सावल्यांचा', 'कळी एकदा फुलली होती', 'झपाटलेली' या नाटकांपैकी 'हा खेळ सावल्यांचा' हे नाटक अधिक प्रभावी ठरले. हे नाटक १९६८ मध्ये मराठी रंगभूमीवर आले. या नाटकातील कलाकारांच्या अभिनयामुळे लक्षवेधी ठरले. चांगले लेखन आणि प्रयोग या दोन्हीचे मिश्रण या नाटकात झाले. या नाटकानंतर त्यांनी 'कळी एकदा फुलली होती' हे नायिका प्रधान नाटक १९७४ साली मराठी रंगभूमीवर आणले. या नाटकाचे अभिनयामुळे प्रयोग यशस्वी होत होते. परंतु नंतरच्या काळात प्रेक्षकांना हे नाटक भावले नाही. त्यामुळे या नाटकाचे अधिक प्रयोग झाले नाहीत. यानंतरची शिरिष पै यांची 'सोन्याची खाण', 'झपाटलेली', ही नाटके प्रेक्षकांवर परिणाम करु शकली नाहीत.

यानंतर ज्योती म्हापसेकर यांचे 'मुलगी झाली हो' हे नाटक १९८३ मध्ये मराठी रंगभूमीवर आले. या नाटकात म्हापसेकर यांनी स्त्री मुक्तीचा विचार मांडला आहे. हा विचार मांडताना कुटुंब व्यवस्था, व्यक्ति स्वातंत्र्य, समाजाची मानसिकता अशा अनेक गोष्टींतून स्त्रीविषयक

प्रश्नांची मांडणी केली आहे. याविषयी दत्ता भगत म्हणतात. 'मुलीचा जन्म, मुलीचा विवाह, नोकरी करणाऱ्या स्त्रीयांचा कोंडमारा अशा स्त्री जीवनातील विविध अवस्थांचे चित्रण नाटकात येते.' (३) म्हापसेकर यांनी केलेल्या या मांडणीत प्रेक्षकांना त्यातील विचार अनुभवायचा आहे, कारण या नाटकात मनोरंजन नाही. लेखिकेची या नाट्यलेखनामागील प्रेरणा सामाजिक प्रश्नांची आहे. त्यामुळे या प्रश्नांना वाचा फोडणे, स्त्रीयांच्या समस्या प्रेक्षकांसमोर मांडणे, प्रेक्षकांमध्ये प्रबोधन करणे, हाच उद्देश लेखिकेचा दिसून येतो.

एकूणच, मराठी साहित्यात कथा, कादंबरी, कविता इ. साहित्य प्रकाराच्या तुलनेत नाटक हा वाङ्‌मय प्रकार स्त्री लेखिकांनी हाताळला नाही. ज्या लेखिकेनी नाट्यलेखन केले त्यांचे एखाद-दुसरे नाटक सोडले तर त्यांच्या पदरी अयशस्वीता आली आहे. सुमतीबाई धनवटे, शिरीष पै, ज्योती म्हापसेकर इ. स्त्री लेखिकेंनी नाट्य-लेखन केले. परंतु त्यांचा प्रेक्षकांवर पाहिजे तेवढा प्रभाव पडला नाही. आपल्या जीवनातील समस्या, सुख-दुःखे, वेदना इ. गोष्टी कथा, कादंबरी, कविता इ. वाङ्‌मय प्रकाराप्रमाणेच नाटकामध्ये आल्या पाहिजेत. तरच स्त्रीयांचे नाट्यलेखन भरीव होईल.

## ● निष्कर्ष

१) पुरुषाच्या नाट्यलेखनाच्या तुलनेत स्त्रीयांनी फारच अल्प प्रमाणात नाट्यलेखन केले आहे.
२) ज्या स्त्रियांनी नाट्यलेखन केले त्यांनी पुढे सातत्य राखले नाही.
३) ज्योत्स्ना देवधर यांना 'कल्याणी' च्या रुपाने व्यावसायिक रंगभूमीवर यश मिळाले परंतु नंतरची त्यांची सगळे नाटके हौशी रंगभूमीकडे झुकली.
४) ज्योती म्हापसेकर यांच्या 'मुलगी झाली हो' या नाटकानंतर मराठी रंगभूमीवर तेवढ्या ताकतीचे अजून नाटक आले नाही.
५) मराठी लेखिकांना कथा, कादंबरी, कविता या साहित्य प्रकाराप्रमाणेच नाटक या साहित्य प्रकारात लेखन केले पाहिजे.

## ● संदर्भ

१) भगत दत्ता, संपा.डॉ.नागनाथ कोत्तापल्ले, वाङ्‌मय प्रकार (काव्य व नाटक) य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथम आवृत्ती, २००२ पृ.७६.
२) देशपांडे वि.भा.मराठी नाटक-नाटककार क्राळ आणि कर्तृत्व, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.पुणे-३०. प्रथमावृत्ती, २००८, पृ.४३१.
३) भगत दत्ता, संपा.डॉ.नागनाथ कोत्तापल्ले, वाङ्‌मय प्रकार (काव्य व नाटक) य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथम आवृत्ती, २००२ , पृ.७७.